मजकुर :—

दिनांक १५/०७/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’**माहे फेब्रुवारी /मार्च/ एप्रिल —२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ फेब्रुवारी —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष—०५, मुंबई | **गु.प्र.शा.,गु.र.क्र. १६/२२, कलम ३०२, १२०(ब), २०१, ३४ भा.द.वि. सह कलम ३, २५, २७ हत्यार कायदा, सह कलम ३(१)(i), ३(१)(i i), ३(२), ३(३), ३(४) मोक्का कायदा १९९९(धारावी पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ६७/२०२२)** |

—: “ पिस्टलच्या सहाय्याने गोळीबार करून जिवे ठार मारणे.’’:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—नमुद गुन्हयात दिनांक १२/०२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा ते १०.४५ वा च्या दरम्यान यातील मयत इसम आमिर अनिस खान हे धारावी परिसरातील मारूती चाळीच्या मागे असलेल्या खाडीच्या बाजूला शौचास गेलेले असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांच्याकडे असलेल्या अग्निशस्त्रातून मयत इसम आमिर खान यावर गोळीबार करून त्याचा खून केला म्हणून अन्वये दोन अनोळखी इसमांविरूध्द खूनाचा गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. मोहम्मद शकील शमशुद्दिन शेख, वय ३२ वर्षे |
| बळीत व्यक्ती | :— | अमिर अनिस खान वय ३२ वर्षा, |
| गुन्हयात वापरलेले हत्यार | :— | गावठी पिस्टल व गावठी कट्टा, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) श्रीमती शमसुनिसा उर्फ शमा गुलाम शेख, वय— ४० वर्षे,<br>२) मो.सईद अनिस शेख उर्फ सईद लंगडा, वय—२७ वर्षे,<br>३) मो.अफसर अक्तरअली शेख उर्फ बबलु मुल्ला, वय—२३ वर्षे<br>४) मो.साहिल मो. कलीम शेख, वय—२४ वर्षे,<br>५) सद्दामहुसेन अस्लम शेख उर्फ सद्दाम मामा, वय—२५ वर्षे,<br>६) मो.शोएब मो.हुसेन खान, उर्फ पापा, वय—२० वर्षे,<br>७) यासीन अब्दुल्ला शेख, वय—२० वर्षे<br>**आरोपी.क्र.१ अ.दि.१३/०२/२०२२ रोजी**<br>**आरोपी.क्र.२ ते ७ अ.दि.१६/०२/२०२२ रोजी** |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात दिनांक १२/०२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा ते १०.४५ वा यातील मयत इसम आमिर अनिस खान हे धारावी परिसरातील मारूती चाळीच्या मागे असलेल्या खाडीच्या बाजूला शौचास गेलेले असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांच्याकडे असलेल्या अग्निशस्त्रातून मयत इसम आमिर खान यावर गोळीबार करून त्याचा खून केला.

गुन्हा घडल्यानंतर गुन्हयाचे घटनास्थळाची बारकाईने तपासणी केली असता, घटनास्थळी एकूण ५ खाली केस आढळून आल्या. त्यावरून आरोपीत इसमांनी अतिजास्त प्रमाणात गोळीबार केली असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळ परिसरात घटनेच्या अनूषंगाने चौकशी केली असता राजीव गांधी नगर परिसरात नव्याने उदयास आलेली ‘‘ K Company ’’ चा टोळीप्रमुख कलीम रौफ सय्यद व त्याचे हस्तकांशी मयत इसमाचे पुर्वीपासून वैमनस्य असल्याचे माहिती मिळून आली. तसेच ‘‘ K Company ’’ चा टोळीप्रमुख कलीम रौफ सय्यद हा सध्या तळोजा कारागृहात न्यायबंदी असल्याची माहिती मिळून आली.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून कक्ष ५ कार्यालयामार्फत खालीलप्रमाणे कामांची वाटप करून तात्काळ पाच पथके तयार करण्यात आली. १) घटनास्थळ परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त करून त्याची तपासणी करणे. २) ‘‘ K Company ’’ चा टोळीप्रमुख व सदस्यांची इंतभूत माहिती गोळा करणे. ३) ‘‘ K Company ’’ चा टोळीप्रमुख कलीम रौफ सय्यद यास कोर्ट परिसर व तळोजा जेल परिसरात भेटावयास येणाऱ्या व्यक्तींची माहिती गोळा करून त्यांना ताब्यात घेणे. ४) ‘‘ K Company ’’ सदस्यांच्या हालचालींवर गुप्तरित्या लक्ष ठेवून त्यांना ताब्यात घेणे. ५) तांत्रिक

तपासाच्या आधारे आरोपीतांचा शोध घेणे.

गुन्हयाचे घटनास्थळाजवळील एका खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याची पाहणी केली असता दिनांक १२/०२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा च्या सुमारास दोन संशयित इसम रिक्षा पार्कीग मधून सायन बांद्रा लिंक रोडच्या दिशेने बाहेर धावत पळत जात असताना दिसून आले. त्यानंतर त्यातील एक संशयित इसम हा पुन्हा राजीव गांधी नगर झोपडपट्टी मध्ये पायी चालत जाताना दिसून आला व दुसरा संशयित इसम एका मो/स्कुटर वर बसून टी जंक्शनच्या दिशेने जाताना दिसून आला. त्यानंतर पथक क्र. १ यांनी मो/स्कुटर वर बसून जाणाऱ्या इसमाचा एकूण ३७ सरकारी व खाजगी कॅमेऱ्यांच्या मदतीने शोध घेतला असता, नमूद मो/स्कुटर वरील इसम टी जंक्शन धारावी वरून ६० फिट रोड मार्गे सायन हॉस्पीटल व तेथून पुढे अॅन्टॉप हिल मार्गे वडाळाच्या दिशेने भरधाव वेगाने जाताना दिसून आले.

वडाळा परिसरात पोहचल्यानंतर नमूद २ इसम एका व्यक्ती सह गप्पा मारताना आढळून आले. नमूद व्यक्तीचा फोटो वडाळा परिसरात दाखविला असता, त्याचे नाव मो. शोएब हुसैन खान असल्याचे माहिती मिळून आली. नमूद शोएब खान याचा गुप्तरित्या शोध घेतला असता, तो दिनांक १२/०२/२०२२ रोजी रात्रौ १२.१५ वा च्या सुमारास महानगरी एक्सप्रेस ने बुरहानपूर येथे गेला असल्याची माहिती मिळून आली. पथक क्र. १ यांनी सदरची माहिती तांत्रिक तपास करणाऱ्या पथक क्र. ५ यांना अवगत करून त्याअनुषंगाने तपास करणेबाबत सुचित केले.

**पथक क्र. २** यांनी धारावी राजीव गांधी नगर परिसरात गुप्तरित्या माहिती प्राप्त केली असता, K Company चा टोळीप्रमुख कलीम रौफ सय्यद, याचेवर सांताक्रुझ पोलीस ठाणेस **MCOCA** अंतर्गत गुन्हे नोंद असून कलीम सय्यद नमूद गुन्हयांमध्ये अदयापपर्यत वॉटेंड आहे. कलीम सय्यद याची धारावी परिसरात प्रचंड दहशत निर्माण झाली होती. कलीम सय्यद याने धारावी परिसरात त्याचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी त्याचे साथीदार नामे परवेज बूट्टा, सईद शेख उर्फ सईद लगंडा, सद्दाम घोडा, अलीगड बिलाल, राजू, बबलू मुल्ला, सद्दाम मामा, अज्जू, दिपचंद जलेला, इदू, नासीर, एल.डी., साहिल व महिला नामे शमा शेख हिच्या मदतीने **‘‘ K Company ’’** प्रस्थापित केली.

के कंपनी सदस्यांनी परिसरात स्वत:चे वर्चस्व निर्माण करण्यासाठी परिसरातील गरीब साधारण व्यक्तींना विनाकारण मारहाण करून परिसरात प्रचंड दहशत निर्माण केली होती. राजीव गांधी नगर परिसरात रहावयास असणारा इसम नामे आमीर अनिस खान (यातील मयत इसम) हा **‘‘ K Company ’’** च्या वर्चस्वाला नेहमी विरोध करत असे तसेच तो शमा शेख हिस अंमलीपदार्थ विक्री करण्यास देखील विरोध करत असे. त्यामूळे ‘‘ **K Company** ’’ कंपनी सदस्य व आमीर यांच्यात अनेकवेळा भांडणे झाली होती. तसेच शमा शेख हिच्याकडे अंमलीपदार्थाची विक्री करणारा इसम नामे बबलू मुल्ला याची व आमीरची देखील अनेकवेळा भांडणे झाली होती. त्यानंतर टोळीप्रमुख कलीम सय्यद सन २०२० साली ५० किलो एम.डी. अंमलीपदार्थ जवळ बाळगताना मिळून आल्याने त्यास डी.आर.आय. तर्फे अटक करण्यात आली होती तेव्हापासून तो तळोजा कारागृहात जेलबंद असल्याची असलेबाबत माहिती प्राप्त केली.

**पथक क्र.३ यांना** दिनांक १३/१२/२०२१ व दिनांक ०३/०१/२०२२ रोजी तारखेच्या दिवशी ठाणे सत्र न्यायालय येथे कलीम सय्यद यास एकूण १० ते १२ पूरूष व १ महिला भेटण्यास आली असल्याचे माहिती मिळाली. नमूद पथक क्र. ३ यांनी ठाणे न्यायालय परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहेत किंवा कसे याची पाहणी केली असता तेथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे नसल्याचे आढळून आले. त्यानंतर नमूद पथक क्र. ३ यांनी आरोपीतास कोर्टात हजर करणाऱ्या पोलीस पथकाशी अधिक माहिती प्राप्त करण्याच्या अनूषंगाने संपर्क केला असता त्यांनी कलीम सय्यद यास भेटण्यास येणारे इसमापैकी काही इसम ठाणे न्यायालय परिसरात व्हिडीओ रेकॉडिंग करत होते म्हणून त्यांनी त्यास हटकले होते. नमूद पथक क्र. ३ यांनी सदरची माहिती ‘‘ K Company ’’ सदस्यांच्या हालचालींवर गुप्तरित्या लक्ष ठेवून असलेले पथक क्र. ४ यांना अवगत करून त्याअनुषंगाने **‘‘ K Company ’’** च्या सदस्यांकडे कलीम सय्यद यास ठाणे न्यायालय येथील भेटी दरम्यानचा व्हिडीओ आहे किंवा कसे याचा शोध घेणेबाबत सुचित केले.

तसेच **पथक क्रमांक ३** यांनी तळोजा कारागृह अधिक्षक यांना भेटून न्यायबंदी आरोपी कलीम सय्यद जेलमधून अधिकृत दुरध्वनीव्दारे कोणाशी संपर्क करतो किंवा कसे याची माहिती घेतली असता, कलीम सय्यद मो.क्र. ८६५७६०११६१ यावर संपर्क करत असल्याची माहिती मिळून आली.

पथक क्र. ३ यांनी सदरची माहिती तांत्रिक तपास करणाऱ्या पथक क्र. ५ यांना अवगत करून त्याअनुषंगाने तपास करणेबाबत सुचित केले.

**पथक क्रमांक ४** यांनी पथक क्रमांक १ व ३ यांनी सुचविल्याप्रमाणे '' K Company '' सदस्य परिसरात शोध घेतला असता, सदस्य नामे परवेज बूट्टा, सईद लगंडा, अलीगड बिलाल, बबलू मुल्ला, सद्दाम मामा व साहिल हे धारावी परिसरातून गायब असल्याची माहिती मिळून आली. तसेच **'' K Company ''** सदस्य परवेज बूट्टा हा सांताक्रुझ पोलीस ठाणे येथील २ व्यक्तींच्या खूनाच्या गुन्हयात ( **डबल MCOCA मध्ये** ) मागील ६ वर्षापासून वॉटेंड असून, सईद लगंडा धारावी पोलीस ठाणे येथील **खूनाचा प्रयत्न** (३०७) मधील गुन्हयात मागील ४ वर्षापासून वॉटेंड व महिला नामे शमा शेख हि एन.डी.पी.एस. च्या गुन्हयात मागील ६ महिन्यापासून वॉटेंड असल्याची माहिती मिळून आली.

त्यानंतर **पथक क्र. ४** यांनी सद्दाम घोडा, दिपचंद जलेला, इदू, नासीर, एल.डी. यांना धारावी परिसरातून व इसम नामे राजू यास नालासोपारा परिसरातून ताब्यात घेतले. त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी दिनांक १३/१२/२०२२ रोजी व दिनांक ०३/०१/२०२२ रोजी ते सर्व टोळीप्रमुख कलीम सय्यद यास भेटण्यासाठी ठाणे न्यायालयात गेले होते अशी माहिती दिली की, त्यानंतर सदरवेळी टोळी सदस्य सईद लगंडा, अलीगड बिलाल, बबलू मुल्ला यांनी टोळीप्रमुख कलीम यास यातील मयत इसम आमीर खान हा त्यांना व शमा शेख हिला जास्त त्रास देत असल्याने शमा शेख हिने आमीर खान यास जिवे ठार मारण्यासाठी १ लाख रू परवेज बूट्टा, सईद लगंडा व अलीगड बिलाल यांना दिले असून अधिक पैसे देण्यास तयार असल्याचे टोळीप्रमूख यास सांगितले. त्यावर टोळीप्रमूख कलीम सय्यद याने अलीगड बिलाल यास परवेज बूट्टा याचे मदतीने यु.पी. येथून बंदूकीची व्यवस्था करणेस सांगून बंदूकीची व्यवस्था झालेनंतर सदर बंदूक सईद लगंडा व बबलू मुल्ला यांना देवून त्याव्दारे आमीर खान यावर गोळीबार करून त्याचा खून करण्यास टोळीप्रमूख कलीम सय्यद याने इतर सदस्यांच्या समक्ष सांगितले असल्याचे टोळी सदस्यांकडून माहिती मिळून आली.

**पथक क्रमांक ५ यांनी** गुन्हयाचे घटनास्थळ धारावी व वडाला (आरोपी घटनास्ळारून वडाला परिसरात गेल्याचे पथक क्र. १ यांना आढळून आल्याने ) परिसरातील टॉवर सेल आय डी प्राप्त करून नमूद दोन्ही ठिकांणावरील डम डाटा प्राप्त करण्यात आला. तसेच पथक क्रमांक १ यांनी संशयित इसम नामे शोएब हा बुरहानपूर राज्य मध्यप्रदेश येथे पळून गेला असल्याची माहिती दिल्याने लागलीच १ पथक बुरहानपूर, राज्य मध्यप्रदेश येथे पाठविण्यात आले.

तसेच पथक क्रमांक ३ यांनी टोळी प्रमुख कलीम रौफ सय्यद हा जेलमधून मो.क्र. ८६५७६०११६१ यावर संपर्क करत असल्याची पथक क्रमांक ५ यांना माहिती दिल्याने नमूद मो.क्र. चा सी.डी.आर. प्राप्त करून संबंधित व्यक्तीचा शोध घेतला असता, नमूद मोबाईल धारक व्यक्ती ही महिला नामे पूजा पाल(टोळी प्रमुखाची प्रेयसी) असल्याचे आढळून आले. महिला नामे पूजा पाल हिच्याकडे अधिक चौकशी करून टोळी सदस्य सईद लगंडा, परवेज बूट्टा व बबलू मुल्ला यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करण्यात आले. नमूद मोबाईल क्रमांकांचे सी.डी.आर. प्राप्त केले असता, ते बंद असल्याचे आढळून आले.

तांत्रिक तपास करणारे सपोनि अमोल माळी व पथकाने जिल्हा बुरहानपूर राज्य मध्यप्रदेश येथे पळून गेलेला संशयित इसम नामे शोएब हुसैन खान यास तांत्रिक तपासाच्या आधारे बुरहानपूर येथून ताब्यात घेतले. नमूद इसमास ताब्यात घेतलेनंतर त्याचेकडे चौकशी केली असता, **'' K Company ''** टोळी सदस्य सईद लगंडा व बबलू मुल्ला यांनी यातील मयत इसम आमीर यावर गोळीबार केला असून सईद लगंडा व सद्दाम मामा बाईक वरून वडाला येथे आले असल्याची माहिती दिली. तसेच परवेज बूट्टा व अलीगड बिलाल यांनी आमीर खान यावर गोळीबार करण्यासाठी बंदूक पुरविली असल्याचे सांगितले. नमूद शोएब खान याचेकडे सईद लगंडा व बबलू मुल्ला यांचे ठावठिकाण्या बाबत विचारणा केली असता, त्यांचे मोबाईल बंद असून आरोपी बबलू मुल्ला हा इन्स्टाग्राम च्या माध्यमातून व आरोपी सईद लगंडा हा त्याचा भाउ अक्रमुददीन शेख याचे फेसबूक मॅसेंजरच्या माध्यमातून शोएब खान याचे संपर्कात असल्याचे आढळून आले.

**पथक क्रमांक ५ यांनी** नमूद शोएब खान याचे फेसबूक मॅसेंवरून आरोपी सईद लगंडा याचेशी संपर्कात राहून त्याचा तांत्रिकदृ टया त्याचा ोध घेतला असता, तो सुरत राज्य गुजरात येथे असल्याचे आढळून आल्याने लागलीच १ पथक सुरत राज्य गुजरात येथे पाठवून ताब्यात असलेला

इसम शोएब खान याचे मदतीने आरोपी सईद लगंडा यास लपलेल्या ठिकाणावरून बाहेर बोलावून त्यास ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने सांगितले की, टोळी सदस्य महिला नामे शमा शेख हिने आमीरचा खून करण्यासाठी १ लाख रू ॲडव्हान्स दिल्याने टोळी प्रमुख कलीम रौफ सय्यद याचे आदेशावरून टोळी सदस्य बबलू मुल्ला व त्याने यातील मयत इसम याचेवर एकूण ८ राउंड फायर करून त्याचा खून केला आहे. तसेच आमीर खान याचा खून करण्यासाठी टोळी सदस्य परवेज बुट्टा व अलीगड बिलाल यांनी बंदूकीची व्यवस्था करून दिली असून इतर टोळी सदस्य शोएब खान, साहिल व यासीन यांनी आमीरचा खून करण्यासाठी त्यांना मदत केली आहे.

**पथक क्रमांक ५** यांनी बुरहानपूर येथून ताब्यात घेतलेला आरोपी नामे  ोएब खान याचे मदतीने इन्स्टाग्राम व्दारे आरोपी बबलू मुल्ला, साहिल व सद्दाम मामा यांचेशी संपर्क साधून त्यांना बुरहानपूर येथे पळून येण्याकरीता उदयुक्त केले. नमूद आरोपी बबलू मुल्ला, साहिल व सद्दाम मामा यांचेकडे बुरहानपूर येथे पळून येण्याकरीता तिकीटाचे पैसे नसल्याने तांत्रिक तपास करणाऱ्या पथकाने त्यांना कुशीनगर एक्सप्रेस चे तिकीट काढून दिले व त्यांना लपलेल्या ठिकाणावरून बाहेर येण्यास उदयुक्त केले. त्यानंतर पाहिजे आरोपी बबलू मुल्ला व साहिल बुरहानपूर येथे पळून जाण्याच्या उददेशाने ट्रेन पकडण्याकरीता लोकमान्य टिळल टर्मिनल्स याठिकाणी आले असता, पथक क्र. १ यांनी त्यांना ताब्यात घेतले. त्याचप्रकारे पाहिजे आरोपी सद्दाम मामा ट्रेन पकडण्याकरीता कल्याण जंक्शन येथे आला असता, पथक क्र. २ यांनी त्यास ताब्यात घेतले. तसेच पथक क्रमांक ३ यांनी पाहिजे आरोपी यासीन यास वडाला परिसरातून ताब्यात घेतले.

नमूद सर्व आरोपीतांनी कक्ष कार्यालयात आणून त्यांचेकडे एकत्रितरित्या विचारपूस केली असता, त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे तपासात नि  पन्न झाल्याने मा. वरि  ठांच्या आदेशान्वये सदरचा गुन्हा कक्ष ५ कडे तपासावर घेवून नमूद सर्व आरोपीतांना दिनांक १६/०२/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात आला. त्यानंतर नमूद आरोपीतांची पोलीस कोठडी प्राप्त करून आरोपीतांनी गुन्हा करणेकरीता वापरलेले हत्यार २ गावठी पिस्टल, १ गावठी कट्टा, १५ जिवंत काडतुसे, २ चॉपर, १ कोयता व गुन्हयात वापरलेली मो/स्कुटर निवेदन पंचनाम्या अंतर्गत हस्तगत करण्यात आली आहे.

त्यानंतर नमूद गुन्हयातील मुख्य सुत्रधार **'' K Company ''** टोळी प्रमुख कलीम रौफ सय्यद यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नमूद सर्व आरोपीतांकडे एकत्रितरित्या विचारपूस केली असता, त्यांनी आशियातील सर्वात मोठी झोपडपटटी असलेल्या धारावी परिसरात स्वत: चे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी **'' K Company ''** ची प्रस्थापित केली आहे. यातील मयत इसम हा नमूद टोळीच्या वर्चस्वास विरोध करत असल्याने तो डोईजड झाला होता म्हणून त्याची हत्या केली असल्याचे तपासात नि  पन्न झाले आहे. अशाप्रकारे नमूद सर्व आरोपी संघटित गुन्हेगारी करून **'' K Company ''** नावाने स्वत:ची नवीन टोळी उदयास आणत असल्याचे नि  पन्न झाल्याने मा. वरि  ठांच्या आदेशावरून नमूद गुन्हयात कलम ३(१)(i), ३(१)(ii), ३(२), ३(३), ३(४) महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियत्रंण कायदा १९९९ ची वाढ करून आरोपीतांविरूध्द **MCOCA** कायदया अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

अशाप्रकारे २ **MCOCA** गुन्हयात मागील ६ वर्षापासून वॉटेंड असलेला आरोपी व १ खूनाचा प्रयत्न या गुन्हयात मागील ४ वर्षापासून वॉटेंड असलेल्या आरोपीतांचा कोणत्याही प्रकारे सुगावा लागत नसताना तांत्रिक व गोपनिय माहितीच्या आधारे कक्ष – ५ यांनी अथक परिश्रम घेवून खुनाच्या गुन्हयातील एकूण ७ आरोपीतांना अटक करून गुन्हयाची उकल केलेली असून आरोपीतांनी गुन्हा करण्याकरीता वापरलेले **२ गावठी पिस्टल, १ गावठी कट्टा, १५ जिवंत काडतुसे, २ चॉपर, १ कोयता व गुन्हयात वापरलेली मो/स्कुटर** हस्तगत केली आहे. तसेच नमूद आरोपीताविरूध्द **MCOCA कायदया अंतर्गत कारवाई करून धारावी परिसरात नव्याने उदयास येवू पाहणाऱ्या '' K Company '' चा नायनाट केला आहे.**

सदरचा गुन्हा हा आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावी परिसरात झाला आहे. नमद आरोपीतांनी भर दिवसा यातील मयत इसमावर गोळीबार करून त्याचा खून केल्याने परिसरातील महिलांमध्ये व जनमानसात भितीचे, असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून मुंबई पोलीस दलातील गुन्हे शाखा कक्ष ०५, गुन्हे शाखा कक्ष ०४, गुन्हे  ाखा कक्ष ०३, परिमंडळ ०५ व धारावी पोलीस ठाणेचे सर्व अधिकारी – अंमलदार या गंभीर गुन्हयाची उकल करण्याकरीता अहोरात्र कार्य करत असताना कक्ष ०५ कार्यालयाच्या पोलीस पथकास सदर गुन्हयाची उकल करण्यात यश मिळाले आहे. त्यामुळे जनमानसात पोलीस

दलाची प्रतीमा सुधारण्यामध्ये कक्ष ५ कार्यालयाच्या अधिकारी कर्मचारी यांनी मोलाची कामगिरी बजावलेली आहे.

ग.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष—०५, मुंबई **तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहा. पोलीस आयुक्त | श्री नामदेव विठ्ठल शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | प्रभारी पोलीस निरीक्षक | घनश्याम सत्यदास नायर, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | सदानंद किशनराव येरेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सयहाय्यक पोलीस निरीक्षक | अर्चना अभिमान पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सयहाय्यक पोलीस निरीक्षक | सुशांत सोपान बंडगर, | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सयहाय्यक पोलीस निरीक्षक | संजय वसंत जगताप | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सयहाय्यक पोलीस निरीक्षक | अमोल माधव माळी | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | सयहाय्यक पोलीस निरीक्षक | जयदीप मोहन जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | लक्ष्मण अमोगसिध्द वडरे | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.पो.उ.नि.क्र. २२५१२ | संजय रामदीप यादव | प्रशस्तीपत्रक |
| ११ | स.पो.उ.नि.क्र.२७९८३ | सुधाकर नामदेव साळूंखे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | स.पो.उ.नि क्र. २८२२७ | अंकुश बाबालाल न्यायनिर्गुणे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | स.पो.उ.नि .क्र.११०३४ | अशोक पांडुरंग भुजबळ | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र.२९७९९ | रविंद्र महिपत राणे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ३१२३४ | धनंजय आनंद पैंगणकर | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र. ३१२४९ | विलास देविदास देसाई, | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र. ३१३१८ | सुजीत भागवत घाडगे, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र. ३३८२७ | मिलींद दिनकर निरभवणे, | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.क्र. ९६०५३६ | नितेश नारायण विचारे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ह.क्र. ९९००३३ | संजय देवजी वायंगणकर | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.क्र. ३३४०९ | इक्बाल संतोष सिंग, | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ना.क्र. ०१—५८ | अविनाश शंकर चिलप | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ना.क्र. ०३२०४ | तानाजी शंकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ना.क्र. ०३—७३८ | सुनिल सुर्यकांत जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र.०८०२१६ | रावसाहेब पांडूरंग फुंदे | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र.०८०३६२ | गणेश रघुनाथ काळे | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र. ०८०६८६ | सरफरोज सलिम मुलाणी | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र.०९०२८४ | युवराज श्रीपती सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र. १५१११३ | प्रमोद धोंडीराम पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ३० | मपोनाक्र. ९८०५४४ | सुनिता संजय शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | मपोनाक्र. ०६०९६८ | दर्शना शशिकांत साळवी | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | मपोशिक्र. ०९१४०१ | सुप्रीया सुभाष पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | मपोशिक्र. ०९१३२९ | भावना जयवंत पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | स.फौ.चा.क्र.२८६१५ | शशीकांत उत्तम घोरपडे | प्रशस्तीपत्रक |
| ३५ | पो.ना.चा.क्र.९९०६०७ | हरेश लक्ष्मण कांबळे | प्रशस्तीपत्रक |

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ फेब्रुवारी —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०२ | माहिम पोलीस ठाणे, परिमंडळ —५, मुंबई | २५/२२ कलम ३०२,३०७,२०१, ११४ भादवि सह कलम ४,२५ भादवि |

—: **“ संगणमत/कट रचुन खुन. ”**:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :—नमुद गुन्हयात दिनांक ०२/०२/२०२२ रोजी ००.३० वाजताचे सुमारास दोन अनोळखी इसमांनी संगणमत करून बळीत महीला नामे हिना शेख हिच्या गळयावर समोरून व मागुन चाकुने वार करून जखमी केले तसेच वसीम यास याच्या पोटात तसेच शरीरावर चाकुने भोसकुन कापीव जखमा करून त्यास जिवे ठार मारले. म्हणून, फिर्यादी यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती संगिता भगवान शेलार, वय—३५ वर्षे, (पो.ना.क्र ०४१०९६), |
| बळीत/मयत | :— | १)मयत — मोहम्मद वसीम, वय २२ ते २३ वर्षे<br>२)जखमी — हिना मोहम्मद अली शेख, वय १९ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) कमरुद्दीन निजाममुद्दीन खान, वय २६ वर्षे<br>२) बालकिशन गोपीनाथ गुप्ता, वय २३ वर्षे<br>३) इम्रान ऊर्फ अल्ताफ सुलतान शेख, वय २५ वर्षे,<br>४ हिना मोहम्मद अली शेख,वय—१९ वर्षे<br>(विधिसंघर्षग्रस्थ बालीका, डोंगरी सुरक्षा गृह येथे जमा)<br>अटक दि.०६/०२/२०२२ रोजी १७:०५ वाजता |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हयाच्या तपासाच्या तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि आव्हाड, पोलीस उपनिरिक्षक नागरे यांनी घटनास्थळी जावुन घटनास्थळ हे निर्जण स्थळी असल्याने घटनास्थळाकडे येणा—या मार्गातील सी सी टी व्ही फुटेज प्राप्त केले. दरम्यान मयत इसमाचे पॅन्टमध्ये गोवंडी ते माहीम येथे रेल्वेने प्रवास केल्याबाबत टिकीट मिळाले. नमुद प्राप्त टिकीटावरील रेल्वेच्या प्रवासाच्या वेळेप्रमाणे गोवंडी रेल्वे स्टेशन येथे जावुन टिकीट काउन्टर व रेल्वे स्टेशन वरील इतर फुटेज प्राप्त करण्यात आले. प्राप्त फुटेजमध्ये मयत इसम व जखमी महीला यांच्याबरोबर आणखी ०२ इसम असल्याचे दिसुन आले. ते सर्व माहीम रेल्वे स्टेशन येथे उतरल्याचे दिसुन आल्याने माहीम रेल्वे स्टेशन ते घटनास्थळ या मार्गातील सी सी टी व्ही फुटेज प्राप्त केले. त्याअनुषंगाने मयत इसमाचे परीचयाचे नमुद ०२ इसमांबाबत चौकशी केली असता ते दोघे मयत इसमाचे मित्र नामे कमरुद्दीन खान, व बालकिशन गुप्ता, असल्याची माहीती मिळाली

त्यावरून संशयीत आरोपी नामे कमरूदद्दीन खान याचा मोबाईल प्राप्त करून त्याचे माबाईलचे लोकेशन घेतले असता ते अकोला जिल्हा येथे असल्याचे दिसुन आले. त्यानंतर पुन्हा पुन्हा लोकेशन घेतले असता नमुद आरोपीत हा प्रवास करत असल्याचे दिसुन आले. त्याचे मोबाईल क्रमांकचा सी डी आर प्राप्त केला असता घटनेचे वेळी घटनास्थळ परीसर येथे लोकेशन दिसुन आले. तसेच त्यामध्ये गुन्हा घडला त्या रात्री कमरुद्दीन व मयत इसम नामे वसीम याचे खुप वेळा बोलणे झाले असल्याचे दिसून येत होते. संशयित इसम कमरुद्दीन व बालकिशन हे मुंबई बाहेर पळून गेले असल्याचे समजले. त्यांचे वापरत्या मोबाईल क्रमांकांचे वेळोवेळी घेतलेल्या लोकेशन्स वरुन ते ट्रेनने नागपुर येथे गेले असल्याचे दिसून आले.

नमुद संशयितांचा शोध घेण्याकरिता दि. ०२/०२/२२ रोजी उशिरा रात्रीच्या वेळेस माहिम पोलीस ठाण्याचे एक पथक नागपूर येथे रवाना करण्यात आले. संशयित आरोपीतांबाबत गोपनिय माहीती व तांत्रिक कौशल्याचा वापर करून त्यांचा शोध घेण्यात आला. त्यामध्ये वरील कमरुद्दीन खान व बालकिशन गुप्ता हे नागपुर येथुन उत्तरप्रदेश येथे जाण्याच्या तयारीत असताना त्यांना पारडी, नागपुर परिसरातुन ताब्यात घेऊन माहिम पोलीस ठाणे येथे आणण्यात आले. माहीम पोलीस ठाणे येथे आल्यावर नमुद इसमांकडे केलेल्या चौकशीत त्यांनी जखमी विधिसंघर्षग्रस्थ बालीका कु. हिना हीच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिल्याने तिला नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

तपासादरम्यान दिनांक ०६/०२/२०२२ रोजी त्यांचा साथीदार अल्ताफ यास अटक करण्यात आली. तसेच विधिसंघर्षग्रस्थ बालीका हिना हीला दिनांक ०२/०३/२०२२ रोजी रूग्नालयातुन डिस्चार्ज मिळाल्याने ती विधिसंघर्षग्रस्थ बालक या सज्ञेत येत असल्याने तिला ताब्यात घेवुन मा.बाल न्यायमंडळ, डोंगरी येथे हजर करण्यात आले असता मा.बाल न्यायमंडळाने तिला सरक्षण गृहात पाठविण्याचे आदेशीत केल्याने तिला मा. बाल न्यायमंडळाच्या आदेशाने जमा करण्यात आले आहे.

अशा प्रकारे माहीम पोलीस ठाणेस दाखल खुन व खुनाचा प्रयत्न या गुन्हयातील जखमी विधिसंघर्षग्रस्थ बालीकेने तिचा नातेवाईक अल्ताफ व इतर ०२ साथीदारांसह फौजदारीपात्र कट रचुन तिने गुन्हयातील अटक ०२ साथीदारांसह मयत प्रियकरास फिरण्याच्या बहाण्याने घटनास्थळी घेवुन येवुन तेथे त्या ०२ साथीदारांसह प्रियकर याचा निर्घृण खुन करून त्यानंतर पोलीसांची दिशाभुल करण्यासाठी स्वत:चे मानेवर तिने स्वत: चाकुने वार करून जखमी करून घेवुन दोन अनोळखी व्यक्तींनी घटनास्थळी येवुन तिचा प्रियकर यास चाकुने ठार मारले व तिला जखमी केल्याचे पोलीसांना असे खोटे सांगीतले असतानाही **तपासी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्यपुर्ण व अत्यंत चिकाटीने तपास करून ३६ तासाचे आत आरोपीतांना पारडी पोलीस ठाणे, नागपुर हदद्दीतुन जेरबंद करून गुन्हा उघडकीस आणला आहे.**

## माहिम पोलीस ठाणे, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहा.पोलीस आयुक्त, माहिम विभाग, | श्रीमती अरूंधीती राणे, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री.प्रविण कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | दिनेश दहातोंडे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | अनिल ढोले, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | स पो नि | प्रविण खराडे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | स.पो.नि, | अतुल आव्हाड, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो उप नि | राजेंद्र नागरे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो उप नि | कपील शिरसाट, | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो उप नि | विकास इंजे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो उप नि | ऋतुपर्ण मसराम | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो उप नि | सिध्दनाथ शेंडगे, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | स.फौ.४८६० | प्रेमसिंग धनसिंग मोरे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र. १२८१४, | सुभाष मोरोती बिरंजे, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शिक्र.१११०८९ | विकास दिंगबरराव ससाणे, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र.११३२२२ | सागर नामदेव राणे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र.१११९६५ | पितांबर राजधर वाघ | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पोशिक्र १४१०५१ | गणेश भाऊलाल पाटील. | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पोशिक्र १११२२५ | नवनाथ भगवान जाधव | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पोशिक्र १११६२४ | मुकुंद मलीक कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पोशिक्र ११३६९० | वैभव विनायक घरत | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पोशिक्र ०९३५३० | चेतन बाळकृभण कांबळे | प्रशस्तीपत्रक |

# (ब) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | कांदिवली पोलीस ठाणे, परिमंडळ—११, मुंबई | गु.र.क्र ३८/२०२२, कलम ३८१, १२० (ब), ११४, ४२०, ४६५, ४६८, ४७१ भा.दं.वि |

**—: '' नोकरी करिता बनावट कागदपत्रे देवून नोकरी मिळवणे व घरातून चोरी करणे '':—**

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—</u>नमुद गुन्हययातील फिर्यादी श्री. गौरव केतन शहा वय ३० वर्षे, यांनी घरकामा करिता नोकर म्हणून दिनांक ०१/०१/२०२२ रोजी रामकुमार अमरनाथ, वय २६ वर्षे यास नोकरीला ठेवले होते.दिनांक २३/०१/२०२२ रोजी फिर्यादी याच्या घरात नोकर नामे रामकुमार अमरनाथ, वय २६ वर्षे याने फिर्यादीच्या राहत्या घरातील बेडरूममध्ये लोंखडी कपाट मधील सोन्याचे व हिऱ्याचे दागिने रुपये १७,००,०००/—किंमतीचे चोरुन नेले म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. गौरव केतन शहा, वय ३० वर्षे, |
| चोरीस गेलेला माल | :— | सोने,चांदी तसेच हिरे जडित दागिने अशी एकुण मालमत्ता किंमत अंदाजे १७,००,०००/— |
| हस्तगत रक्कम | :— | सोने,चांदी तसेच हिरे जडित दागिने अशी एकुण मालमत्ता किंमत अंदाजे १३,६०,९८८/—रूपये |
| आरोपी अटक व दिनांक | :— | जवाहर मंगनु पांडे उर्फ बच्छु वय ३५ वर्षे,<br>अटक आरोपी .दिनांक १६/०३/२०२२ रोजी |

तपास कौशल्य :— यातील पाहिजे आरोपित इसम नामे रामकुमार अमरनाथ वय २६ यास नोकरी वर ठेवणारा इसम नामे श्री. शंभु गुप्ता याचेकडून आरोपित इसम रामकुमार अमरनाथ याचे मुंबईतील इतर संपर्क करणारे इसमांबाबत प्रथमत: माहिती घेण्यात आली. सदर गुन्हयातील आरोपित इसम वापरत असलेला मोबाईल क्रं ९५१७३७७५२० बाबत माहिती घेतली असता सदर मोबाईल क्रमाक हा इसम नामे ताज खान, यांचे नावे असल्याचे दिसून आले. तसेच आरोपिताचे काका विनोद याचे मोबाईल क्रमांक ७२६८०४९५८९ बाबत माहिती काढली असता सदरचा मोबाईल हा अचलकुमार प्रजापती, राहणार राज्य— उत्तर प्रदेश यांचे नावे असल्याचे दिसून आले.

यातील आरोपित रामकुमार याचे मोबाईल क्रमाकाचे सीडीआर प्राप्त करून त्याचे विश्लेषण केले असता त्यामध्ये जास्त कॉल मो.क्रं ९१७२५६३४८५ यावर होत असल्याचे दिसून आले. तसेच दिनांक २३/०१/२०२२ रोजी गुन्हा घडत असताना वा घडण्यापुर्वी मोबाईल क्रमाक ७५१८००६२४२ द्वारे संपर्क झाल्याचे दिसून आले.

त्यावरून मोबाईल क्र ७५१८००६२४२ बाबत अधिक माहिती घेतली असता सदरचा मोबाईल हा आशियाना टॉवर समोर, शांतीलाल मोदी रोड, कांदिवली पश्चिम,मुंबई येथे एका वडापाव विक्री करणारे श्री. रिंकु गुप्ता यांचा असल्याचे समजले. त्यावरून श्री. रिंकु गुप्ता यांना पोलीस ठाणेस बोलावून त्याचेकडे आरोपित इसमाचे मोबाईल क्रमाकाबाबत अधिक तपास केला असता त्याने माहिती दिली की, दिनांक २३/०१/२०२२ रोजी ते त्यांचे वडापाव गाडीवर असताना सुमारे दुपारी १२.५० वा. दरम्यान त्यांचे दुकानावर एक इसम आला व त्याने १४ ते १५ वडापाव हवे असल्याचे सांगून श्री. रिंकु गुप्ता यांचा मोबाईल फोन करण्यासाठी मागितला.

सदर गुन्हयात प्राप्त मोबाईल सीडीआरद्वारे यातील आरोपितांनी आपली ओळख लपविण्याकरिता विविध मोबाईल क्रमांकाचा वापर केलेला आहे. यातील आरोपित इसम रामकुमार याने त्याचा मोबाईल क्रमाक ९५१७३७७५२० द्वारे फक्त ७२६८०४९५८९ व ८८१०९१८६४१ या क्रमांकाशी संपर्क केलला असून यातील मोबाईल क्रमक ७२६८०४९५८९ व ८८१०९१८६४१ याचे लोकेशन्स हे यापुर्वी जि. बलरामपूर, राज्य. उत्तर प्रदेश येथे असल्याने नमुद ठिकाणी जावून आरोपिताबाबत माहिती प्राप्त करणेकामी दिनांक २७/०१/२०२२ रोजी पोलीस पथक राज्य—उत्तर प्रदेश येथे रवाना झाले.

दिनांक २७/०१/२०२२ रोजी ते दिनांक ०४/२/२०२२ रोजी पर्यत पोलीस पथकाने यातील पहिजे आरोपी इसमाचा शोध घेणेकामी उत्तर प्रदेश राज्यातील १)एकोला पोलीस ठाणे, जिला—सरावस्ती राज्य—उत्तर प्रदेश २) देहात पोलीस ठाणे, जिला—बलरामपुर राज्य—उत्तर प्रदेश,३) कैवडीया पोलीस ठाणे, जिला—गौडा राज्य—उत्तर प्रदेश व ४) कटराबाजार पोलीस ठाणे जिला—गौंडा राज्य—उत्तरप्रदेश या ठिकाणी

जावून एकुण १९ मोस्ट कॉलर तपासले. त्यावरून पोलीस पथकास अशी माहिती मिळाली की, आरोपी इसमाचे मोबाईल क्रमांक ९५१७३७७५२०ए ७२६८०४९५८९ए ८८१०९१८६४१ या मोबाईल क्रमांकाचे सीडीआर वरून त्याचे मोस्ट कॉलरची पडताळणी केली असता यातील आरोपी इसमाने सदरचे मोबाईल हे चोरी व गहाळ झालेले वापरलेले असुन नमुद मोबाईल क्रमांकाचे सीडीआर मधील वर नमुद मोस्ट कॉलर हे गुन्हयाशी वा आरोपी इसमाशी संबधित नसल्याची माहिती प्राप्त झाली.

दरम्यान यातील फक्त मोबाईल क्रमांक ९९२०७२७१९६ Mr. Kayam Ali Ramjan Ali Hashmi हा मोबाईल क्रमांक आरोपी इसमाच्या आयएमईआयशी संबधित असल्याने कौडीया पोलीस ठाणे, मदतीने तसेच पोउनि इंद्रजित भिसे व पथक यांच्याशी मुंबई स्थित मदतीने नमुद मोबाईल धारक ९९२०७२७१९६ याचा शोध घेतला असता तो धारावी, मुंबई येथे मिळुन आला. त्याने माहिती दिली की, मागील जानेवारी महिन्यामध्ये त्याचे राहते गाव रामपुर, जिला–कर्नलगंज राज्य–उत्तरप्रदेश येथील इसम नामे जवाहर पांडे उर्फ बच्छु पांडे याने त्याचा मोबाईल विकत घेतला होता. त्यावरून नमुद गुन्हयामध्ये मुख्य आरोपी हा जवाहर पांडे उर्फ बच्छु असल्याचे माहिती प्राप्त झाली.

त्यावरून दिनांक १०/०३/२०२२ रोजी रवाना झालेले पो.उ.नि सुर्यकांत पवार व पथक हे नमुद गुन्हयातील आरोपी इसम जवाहर पांडे याचा शोध घेणेकामी उत्तर प्रदेश येथे रवाना झाले. आरोपीताचे लोकेशन रामपुर पुलिया राज्य–उत्तरप्रदेश येथे असल्याची माहिती मिळाल्यावरून त्यास दिनांक १४/०३/२०२२ रोजी ०४.२० वाजता स्थानिक कट्टा बजार पोलीस ठाणे, राज्य उत्तरप्रदेश यांचे मदतीने आरोपित इसमास अटक करण्यात आली.

त्याच्याकडे गुन्हयाचा अधिक तपास केला असता त्याने माहिती दिली की, त्याचा साथीदार अर्जुन पासी रा.ठि– रामगज तिरलेली, परवा पुटे सहेरी कट्टा बजार राज्य–उत्तरप्रदेश हा सदर गुन्हयातील मुख्य आरोपी असुन त्याच्या सांगण्यावरून दुसरा साथीदार गुठेय मेहकु पासी, वय २४ वर्षे, ाला रामकुमार अमर नाथ वय अंदाजे २३ वर्षे, आधारकार्ड क्र ७२०२८५६६०३११ या नावाचे नकली आधारकार्ड बनवुन कांदिवली मुंबई येथे नोकर म्हणुन कामावर ठेवले होते. दिनांक २३/०१/२०२२ रोजी अर्जुन पासी व गुठेय यांनी त्याच्या घरातील कपाट तोडुन वर नमुद मालमत्ता चोरी केली होती.

त्यास मी बाहेरून वॉच ठेवुन चोरी करण्यास सहभाग होतो. दिनांक २९/०१/२०२२ रोजी चोरी केलेली मालमत्ता घेवुन सर्वजन गावी आलो होतो. त्यावरून नमुद गुन्हयामध्ये पाहिजे आरोपी नामे १) गुठेय मेहकु पासी वय २४ म्हणजेच रामकुमार अमर नाथ, वय अंदाजे २३ वर्षे, २) अर्जुन पासी नोंद घेण्यात आली. नमुद अटक आरोपी जवाहर पांडे यांच्याकडे दोन पंचासमक्ष केलेल्या निवेदन पचनामा अतंर्गत दिनांक १७/०३/२०२२ रोजीच्या रिमांडमधील हस्तगत मालमत्ता करण्यात आलेली आहे.

यातील अटक आरोपी जवाहर मंगनु पांडे उर्फ बच्छु वय ३५ वर्षे, यास दिनांक १६/०३/२०२२ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यास दिनांक १७/०३/२०२२ रोजी अटक आरोपीतास मा.न्यायालयात रिमांडकामी हजर केले असता त्यास मा.न्यायालयाने प्रथमत: दिनांक १९/०३/२०२२ रोजी पर्यत व त्यानंतर दिनांक २३/०३/२०२२ रोजी पर्यंत पोलीस देण्यात आली आहे.

यातील अटक आरोपित इसम जवाहर पांडे याचे विरूध्द अशाच प्रकारे चोरी केल्याबाबत आंतरराज्यीय गुन्हे नोद आहेत. १) मॉडेल टॉवन पोलीस ठाणे, जिल्हा– लुधीयाना, राज्य –पंजाब, गुरक्र १७/२०१८ कलम, ३९५,४११, १४८, १४९, भादवी व २) एअरपोर्ट पोलीस ठाणे जिल्हा–अमृतसर, राज्य– पंजाब गुरक्र ३५/२०१८ कलम, ३८१, १२०(ब) भादवी दृ गुन्हे नोंद आहेत.

## कांदिवली पोलीस ठाणे, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | दिनकर जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरिक्षक | दिपशिखा वारे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस उप निरिक्षक | सुर्यकांत पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरिक्षक | इंद्रजित भिसे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | म.पो. शि. क्र.०९०१२६० | मोनिका जॉन गोम्स | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र. ९८०३६६ | सत्यवान जगदाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ना.क्र. ९८०९३५ | अनिल जैतापकर | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०८ | पो.ना.क्र. ०३९७२ | श्रीकांत तावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो. शि. क्र ०८१७१५ | सुजन केसरकर | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो. शि. क्र ०७१२६७ | रवि राउत | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो. शि. क्र ०९३०८९ | स्वप्निल जोगलपुरे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो. शि. क्र१११७४ | दादासाहेब घोडके | प्रशस्तीपत्रक |

## (क) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ एप्रिल —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | भोइवाडा पोलीस ठाणे मुंबई परिमंडळ—०४, मुंबई | गु.र.क्र १२६/२०२२, कलम ३९४, ३४ भादंवि. |

—: **" हत्याराने जखमी करून जबरी चोरी "**:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :—नमुद गुन्हयात दि. १४/०३/२०२२ रोजी पहाटे ०५:३० वाजताच्या सुमारास फिर्यादी श्री शहारूख कयामुद्दीन खान, वय २६ वर्षे, यांना शिंदेवाडी, दादर पुर्व, मुंबई याठिकाणी तीन अनोळखी इसमांनी त्यांचे ताब्यातील मोटार सायकलवरून येवुन, फिर्यादी टॅक्सीत बसले असताना सदर टॅक्सीच्या दरवाजाच्या काचा फोडुन त्यापैकी दोन्ही इसमांनी त्यांचे हातातील चाकुने फिर्यादींचे दोन्ही हातावर वार करून दहशत निर्माण केली व त्यांचे ताब्यातील रोख रू. १५,००,०००/— ची जबरीने चोरी केली म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री शहारूख कयामुद्दीन खान, वय २६ वर्षे, |
| चोरीस गेलेला माल | :— | एकुण ७२,००,०००/— रूपये<br>(फिर्यादी यांनी तक्रार करताना रोख रू. १५,००,०००/— असे सांगीतले होते.परंतू एकुण रकमेत ४३,७९,०००/— रूपये कमी असल्याने पुरवणी जबाब घेऊन नोंद घेण्ध्यात आली. ) |
| हस्तगत केलेला माल | :— | १) ५०० रूपये दराच्या ३००० नोटा. एकुण रूपये १५,००,०००/—<br>२) ५०० रूपये दराच्या २५८ नोटा. एकुण रूपये १,२९,०००/—<br>३) ५०० रूपये दराच्या ८५०० नोटा. एकुण रूपये ४२,५०,०००/—<br>एकुण रूपये ५८,७९,०००/— |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) अर्शद निसार अहमद अन्सारी, वय २८ वर्षे,<br>२) अमीर अरमान शाह ऊर्फ आमु, वय २२ वर्षे,<br>३) वसीम साजिद अन्सारी, वय २३ वर्षे,<br>४) शहाबाज रजाक पिंजारी, वय २१ वर्षे,<br>अटक दिनांक ११/०४/२०२२ रोजी |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हयात घटनास्थळाचा दोन पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला. तांत्रीक तपासात सदर ठिकाणावरील डम डाटा प्राप्त केला. तपासात प्राप्त झालेल्या मोबाईल क्रमांक मधील संशयीत मोबाईल क्रमांक चे सी. डी. आर. व एस. डी. आर. प्राप्त करण्यात आले. तसेच घटनास्थळावरील व आसपासच्या परिसराचे फुटेज तपासले असता फुटेजमध्ये यातील फिर्यादी सना ट्रॅव्हल्स मधुन नमुद गुन्हयाच्या घटनास्थळी पहाटे ०५:४० वाजताच्या सुमारास उतरताना दिसत असुन त्यांच्या पाठोपाठ एक संशयीत इसम फिर्यादींचा पाठलाग करीत उतरला असल्याचे दिसत होते.

त्याअनुषंगाने सना ट्रॅव्हलसचे दिनांक १४/०३/२०२२ रोजीचे चालक नामे रियाज अहमद शब्बीर अहमद शेख, वय ४८ वर्षे, व त्याचे सोबत असणारा क्लिनर हारून यांना पोलीस ठाणेस बोलावुन त्यांचेकडे दाखल गुन्हयाबाबत चौकशी केली असता कोणतीही उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. कसारा जिल्हा ठाणे, येथील स्टार हायवे हॉटेल येथील डम डाटा प्राप्त होताच विश्लेंन करून संशयीत मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आर. व एस.डी.आर. प्राप्त करण्यात आले. व तपास करण्याकरीता एक पथक परवानगीने दिनांक २९/०३/२०२२ रोजी मालेगाव परिसरात पाठवित आले.

तपासा करीता रवाना झालेल्या पथकाने दोन इसमांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस आणले. पोलीस ठाणेस आलेनंतर नमुद ताब्यातील इसमांकडे दाखल गुन्हयाच्या तपास केला असता एक इसम नामे अर्शद निसार अहमद अन्सारी, वय २८ वर्षे याचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

त्यानंतर अटक आरोपीताने त्याच्या हिश्शाला आलेले पैसे आरोपीने ज्या ठिकाणी ठेवले होते ती जागा दाखवली. नमुद ठिकाणी एका खोलीमधील पलंगाच्या खाली सफेद रंगाची प्लॅस्टीच्या पिशवीमध्ये नमुद गुन्हयातील जबरी चोरी केलेली रोख रक्कम १५,००,०००/— रूपये ठेवलेले होते. सदर रक्कम निवेदन पंचनाम्यांतर्गत ताब्यात घेण्यात आली

त्यानंतर नमुद गुन्हयातील पोहिजे तीन आरोपीतांचे मोबाईल क्रमांकाचे सी. डी. आर. प्राप्त करून त्याचे विश्लेशन केले. तद्नंतर गुप्त बातमीदारांमार्फत गुन्हयातील पाहिजे आरोपी हे सचीन, जी.आय.डी.सी.,

सुरत, राज्य गुजरात येथे वेशभुषा बदलून राहत असल्याची खात्री लायक बातमी मिळाल्याने दिनांक ०९/०४/२०२२ रोजी पाहिजे आरोपितांचा शोध घेणेकरीता पोलीस पथक रवाना झाले. दिनांक १०/०४/२०२२ रोजी पो.नि. निकम व पथक यांनी सचीन जी.आय.डी.सी., पोलीस ठाणे यांचे मदतीने तसेच गुप्त बातीमदारने सांगितल्याप्रमाणे नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी १) वसीम साजिद अन्सारी, २) अमीर शहा ऊर्फ आमु व ३) शहाबाज मन्सुरी ऊर्फ लंबु यांचा शोध घेणेकामी संजर नगर ४, उनपाटीया, सचीन, सुरत येथे त्यांचे नातेवाईकांचे राहते पत्त्यावर येथे गेले असता पाहिजे आरोपीतांनी त्यांचे घरातुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला. त्यांना सापळा रचुन शिताफीने ताब्यात घेण्यात आले. नमुद ताब्यातील इसमांकडे दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्यांचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

त्यानंतर आरापी शहाबाज रजाक पिंजारी, वय २१ वर्षे याने नमुद गुन्हयातील जबरी चोरी केलेली रक्कम एका जागेवरती ठेवली आहे, ती दाखवतो असे निवेदन केल्याने दोन पंचासमक्ष निवेदन पंचनामा करून ५०० रूपये दराच्या २५८ भारतीय चलनी नोटा. एकुण किंमत रूपये १,२९,०००/— ही पंचनाम्या अंतर्गत ताब्यात घण्यात आली. इसम नईम अख्तर मोबीन अहमद अन्सारी, वय २५ वर्षे, याने वर नमुद गुन्हयातील अटक आरोपितांनी त्याचे राहते घरी सामान ठेवले होते. सदर सामानामध्ये नमुद इसमास रोख रक्कम ४२,५०,०००/— रूपये मिळुन आल्याने त्यास सदरची रक्कम ही नमुद गुन्हयातील चोरीची मालमत्ता असल्याचे संशय व खात्री असल्याने त्याने पोलीस ठाणेस सदरची रक्कम सादर केली.

अशा प्रकारे सदर गंभीर गुन्हयाची दखल घेवून वरिष्ठांच्या आदेशानुसार पो.नि. संजय निकम यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाने प्राप्त सी.सी.टी.व्ही. फुटेज व तांत्रीक माहितीच्या आधारे सलग आठ दिवस आरोपीतांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला व मालेगाव शहर अतिशय संवेदनशील असल्यामुळे सर्वोतपरी खबरदारी घेऊन गुन्हयात लुटलेली रक्कम रूपये ५८,७९,०००/— (अठावण लाख, एकोणऐंशी हजार) रोख रक्कम, गुन्हयात वापरलेले हत्यार, वापरलेले वाहन, आरोपीतांकडुन हस्तगत केली.

सदरच्या कारवाईमुळे पोलीसांची प्रतिमा वृद्धींगत होण्यास मदत झाली असुन जनतेचा पोलीसांवरील विश्वास वाढण्यास मदत झाली आहे. या कामगिरीमुळे जनमानसात मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचावलेली आहे.

**भेईवाडा पोलीस ठाणे, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | संजय निकम | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस उप निरीक्षक | शंकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस उप निरीक्षक | सचिन पाटणे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोहक्र.९९०५६६ | मदने | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोशिक्र.०९३७२५ | सय्यद | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोशिक्र. ०७.०४९१ | घस्ते | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोशिक्र. ११३५४९ | तडवी | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोशिक्र.११०९९१६ | रणधीर | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोशिक्र.०८११०८ | मोपारी | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोशिक्र.०९.३५३५ | ननावरे | प्रशस्तीपत्रक |

# (क) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ एप्रिल –२०२२

| ०२ | वर्सोवा पोलीस ठाणे परिमंडळ –०९, मुंबई | गु.र.क्र २३५/२०२२ कलम ३०२,२०१ भा.दं.वि. |
|---|---|---|

–: " गळा दाबुन खुन ":–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :–** नमुद गुन्हयात दि. २८/०४/२०२२ रोजी वर्सोवा गस्त मोबाईल वरुन सुमारे १७:३० वा. पोलीस ठाणेस संदेश प्राप्त झाला की, बरिस्ता चौपाटी येथे गोणीमध्ये मानवी मृतदेह आहे. सदर ठिकाणी पोलीस पथक गेले असता गोणीमध्ये डावा पाय बाहेर आलेला व कुजलेल्या अवस्थेत मृतदेह दिसुन आला. अज्ञात इसमाने मयत महीलेचा वायरने गळा बांधून तिचा खुन केला व पुरावा नष्ट करण्यासाठी तो गोणी भरून फेकून दिली. सदरबाबत पोलीस अंमलदाराच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री गजानन अशोकराव पुयड,वय ३२ वर्षे, |
| बळीत | :– | सोनम श्रीकांत शुक्ला, वय १९ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :– | मोहम्मद शहाजेब शोहाब अन्सारी वय २३ वर्षे, अटक दिनांक ३०/०४/२०२२ रोजी |

**तपास कौशल्य :–** नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान गोरेगांव पोलीस ठाणे येथे हरविलेली मोठी व्यक्ती रजि.क्र ४३/२०२२ मधील हरविलेली मुलगी सोनम श्रीकांत शुक्ला, वय १९ वर्षे, या मुलीने परिधान केलेल्या कपडयांच्या वर्णनाशी मयत महिलेचे कपडयाचे वर्णन जुळत असल्याचे निष्पन्न झाले. सदर प्रकरणी तक्रारदार असलेले इसम श्री. श्रीकांत हिरामणी शुक्ला, वय ४९ वर्षे यांना पोलीस ठाणेस बोलावुन त्यांना कुपर रुग्णालय, मुंबई येथील शवागृहात असलेला मृतदेह दाखवला असता तीच्या कपडयावरुन सदरचा मृतदेह हा त्यांची मुलगी कु. सोनम श्रीकांत शुक्ला, हिचाच असल्याचे खात्रीपुर्वक सांगितले.

गोरेगांव पोलीस ठाणे येथे हरविलेली मोठी व्यक्ती रजि.क्र ४३/२०२२ च्या अनुषंगाने गोरेगाव पोलीस ठाणे कडुन केलेल्या चौकशीबाबत माहिती घेण्यात आली. त्यांच्या चौकशीतील निष्कर्ष व साक्षीदारांच्या नोंद केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. संबंधीत सर्व साक्षीदारांना तथा मयत मुलीच्या मित्र मैत्रिणींना तपासकामी बोलावून त्यांच्याकडे अधिक तपास करण्यात आला. गोरेगांव पोलीस ठाणे कडुन ज्या साक्षीदारांची चौकशी करण्यात आली नाही अशा साक्षीदारांना व त्यांनी चौकशी केलेल्या साक्षीदारांकडे सातत्यपुर्ण तपास केला. त्यामध्ये साक्षीदार नामे जाफर उलजार मन्सुरी, याचेकडे केलेल्या कौशल्यपुर्वक चौकशीत सदर प्रकरणी मोहम्मद शाहजेब शोहाब अन्सारी, याचा सहभाग असल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाले.

मयत महिलेची बहिण सिमरण श्रीकांत शुक्ला हिचेकडे केलेल्या चौकशीत तिच्याकडुन मोहम्मद शहाजेब शोहाब अन्सारी याच्याशी मयत मुलीचे प्रेम संबंध असल्याची माहिती मिळाली. सदर प्रकरणी शहाजेब शोहाब अन्सारी याचेबाबत केलेल्या अधिक तपासात तो बिजनौर, उत्तरप्रदेश येथे गेल्याची माहिती मिळाली. त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीताच्या राहते घराची दोन पंचासमक्ष घरझडती घेवुन पंचनामा करण्यात आला. आरोपीताच्या घरी मृतदेहासोबत मिळुन आलेल्या लुंगीच्या कपडयाचा दुसरा तुकडा, वायरने गळा आवळला त्यावायर सारखा दुसरा तुकडा तसेच पीलो कव्हर सारची दुसरी पीलो कव्हर इत्यादी वस्तु मिळुन आल्या त्या पंचनाम्या अंतर्गत ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

सदर गुन्हयाचा तपास तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कोणताही दुवा नसताना सातत्यपुर्ण व कौशल्यपुर्वक तपास करून ४८ तासाच्या आतमध्ये आरोपीस अटक करून गंभीर गुन्हयाची उकल केली. त्यामुळे जनतेचा पोलीसांवरील विश्वास वाढण्यास मदत झाली आहे. या कृामगिरीमुळे जनमानसात मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचावलेली आहे.

## वर्सोवा पोलीस ठाणे, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरि ठ पोलीस निरीक्षक | सिराज इनामदार, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | कौस्तुभ मिठबावकर, | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | पोलीस निरीक्षक | करण सोनकवडे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | सुनिल वरुडे, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस निरीक्षक | संग्रामसिंह पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा.पोलीस निरीक्षक | विवेक खवळे, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहा.पोलीस निरीक्षक | संजय कांदळकर | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | सहा.पोलीस निरीक्षक | सोहन कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | माणिक मोहिते, | प्रशस्तीपत्रक |
| १० | परि. पोलीस उप निरीक्षक | संदिप निकम, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | परि पोलीस उप निरीक्षक | सचिन पवार, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ९६१६४२ | अंकुश गवळी, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र. ०५०२६४ | पांडुरंग पवार, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ना.क्र. ०५०८५१ | सादीक काझी, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र. ०६१७१७ | दिशांत भिंगारदिवे. | प्रशस्तीपत्रक |
| १६ | म.पो.शि.क्र. ०७०६९९ | शिल्पा ढोरे. | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. ०८००८९ | तु ाार भोसले, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र. ०९०५२७ | देविदास साबळे, | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. ०९१७०१ . | योगेशकुमार जांभळे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र. ०९२०२० | निलेश किंजळकर, | प्रशस्तीपत्रक |
| २१ | म.पो.शि.क्र. ०९२७७८ | विदया कावरे, | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र ११०१३९ | विशाल थोरात, | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.क्र. १११२८८ | बाळासाहेब बेंद्रे. | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र. १११७३६ | सागर अवघडे, | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र. ११३१९० | अमोल घाडगे. | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र. ११३५४४ | रोहन चव्हान, | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र. ११३६०३ | सचिन वखरे. | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र. १३०४३० | गजानन पुयड | प्रशस्तीपत्रक |